लोकमत

# अभिनव देशमुख यांचे उद्या व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांचे बुधवारी (दि. २५) दुपारी दोन वाजता व्याख्यान होणार आहे. मानव्यशास्त्र सभागृहातील या व्याख्यानाचा विषय 'स्पर्धा परीक्षा आणि रोजगार संधी व आव्हाने' असा आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत, अशी माहिती केंद्राचे समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी दिली.

Kolhapur Main
Page No. 4 Sep 24, 2019
Powered by: erelego.com

# किर्लोस्कर वसुंधरा महोत्सव ऑक्टोबरमध्ये

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'दहावा किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव ९ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत होणार आहे. देशातील सहा राज्यात २८ शहरांमध्ये गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने हा महोत्सव आयोजित केला जातो. यंदा, प्लास्टिकला नकार, वसुंधरेला होकार या मध्यवर्ती संकल्पनेवर महोत्सवातील चित्रपट प्रदर्शनासह स्पर्धा, प्रदर्शनांचे आयोजन केले आहे,' अशी माहिती महोत्सव समितीचे अध्यक्ष उदय गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, 'प्लास्टिकबंदीच्या कायदा निर्मितीमध्ये सहभागी असलेले महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मुख्यालय प्रादेशिक अधिकारी नंदकुमार गुरव यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. खडकवासला धरणाच्या पुनरुज्जीवनासाठी झटणारे निवृत्त कर्नल सुरेश पाटील यांच्या उपस्थितीत महोत्सवाचा समारोप होणार आहे. तसेच पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना श्रीमंत संयोगिताराजे छत्रपती यांच्या हस्ते वसुंधरा सन्मान, वसुंधरा मित्त व वसुंधरा गौरव या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे. दसरा चौक येथील शाहू स्मारक भवन येथे महोत्सवातील सर्व कार्यक्रम होणार आहेत.


प्रातिनिधिक छायाचित्र

या महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठ, केआयटी कॉलेज, सायबर, न्यू आर्किटेक्ट कॉलेज, दळवीज आर्ट इन्स्टिट्यूट, डी. वाय. पाटील इंजिनीअरिंग कॉलेज यांचा सहभाग आहे. तर किर्लोस्कर ऑइल इंजिन लिमिटेड उद्योग समूह व पर्यावरण क्षेत्रातील स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते संयोजन करत आहेत.

महोत्सवातील स्पर्धा, उपक्रम यामध्ये सहभागी होण्यासाठी अनिल चौगुले ९४२३८५८७११ किंवा वीरेश शिवपूजी ९७६२९४७४७६ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. पत्रकार परिषदेस किर्लोस्कर ऑइल इंजिनचे सहाय्यक उपाध्यक्ष धीरज जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक रमेश चव्हाण, एम.ई. कोयल, राहुल पवार, भाऊसाहेब सूर्यवंशी, विजय टिपुगडे, ऐश्वर्या मुनीश्वर, अनिल गुरव, केदार मुनीश्वर आदी उपस्थित होते.

## प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या पीएचडी, एमफील परीक्षेसाठी कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यातील केंद्रातून ३६८१ विद्यार्थी बसले. एकुण ४५३६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ८५५ विद्यार्थी गैरहजर होते. ४२ विषयांसाठी ही परीक्षा पार पडली.

# कष्टासोबत प्रामाणिकपणा हवा

कोल्हापूर टाइम्स टीम

‘उद्योग जगतात नोकरीच्या संधी शोधताना उमेदवाराकडे त्या इंडस्ट्रीजविषयीचे प्राथमिक ज्ञान, कष्टाची तयारी आणि प्रामाणिकपणा आवश्यक आहे. सोबतीला संभाषण कौशल्य, बाजारपेठेचा अभ्यास गरजेचा आहे’ असा सूर शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागातर्फे आयोजित ‘एच आर मीट’मध्ये उमटला. वेगवेगळ्या इंडस्ट्रीजमधील संधी आणि अपेक्षा या अनुषंगाने विविध कंपनीच्या एच आर विभागातील प्रमुख आणि तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थी यांच्यामध्ये संवाद घडला. तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले.

डॉ. बागी म्हणाले, ‘मोठ्या कंपन्यांसोबतच आंतरराष्ट्रीय पातळीवर करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. त्यासाठी विषयाचा सखोल अभ्यास, व्यावसायिक कौशल्ये आणि उद्योग क्षेत्रातील अपडेटचे ज्ञान आवश्यक आहेत. शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना इंडस्ट्रीजमधील घडामोडींची माहिती समजण्यासाठी उपक्रम मोलाचा आहे.’



शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागातर्फे ‘एच. आर. मीट’ उपक्रमांतर्गत कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी विभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, विभागातील प्राध्यापक व कंपन्यांचे प्रतिनिधी.

## ‘एच आर मीट’मध्ये उद्योग जगताच्या अपेक्षा

वालचंद कॉलेजमधील प्लेसमेंट सेलचे ऑफिसर प्रो. संजय धायगुडे यांनी विद्यार्थ्यांना मुलाखतीचे तंत्र, परदेशातील करिअरच्या संधी, तंत्रज्ञान विभागाकडून प्रशिक्षणासाठी निधीची तरतूद आणि बँकेकडून मिळणारे अर्थसहाय्य याविषयी मार्गदर्शन केले. उद्योग जगताने अपेक्षा व्यक्त केल्या.

एच आर. विभागातील तेजस मगदूम, अतुल जगदाळे, इम्रान मोमीन, राजीव जांभेकर, धनंजय रानडे, सचिन पाटील, स्वाती पाटील, स्वप्निल विचारे, किरण पाटील, जब्बार शेख आदींनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दरम्यान डॉ. शिवाजी सादळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. के. साहू, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. ए. बी. कोळेकर, डॉ. एस.बी. चव्हाण, डॉ. महेश साळुंखे, डॉ. रश्मी देशमुख, प्रा. उदय पाटील आदी उपस्थित होते.

पुढारी

# युवा महोत्सवात लोककलेचे अनोखे दर्शन

**ऐतवडे खुर्द : वार्ताहर**

शिवाजी विद्यापीठाचा ३९ वा युवा महोत्सव येथील वारणा महाविद्यालयात उत्साहात साजरा झाला. वारणा शिक्षण संस्था संचलित वारणा महाविद्यालयाने या महोत्सवाचे नेटके संयोजन केले. परिसरातील रसिकांनी गर्दी केली होती.

लघुनाटिका, मूकनाट्य, लोकनृत्य, पथनाट्य, विविध वेशभूषामध्ये सादरीकरण करण्यात आले. सांगली जिल्ह्यातील ४४ महाविद्यालयांतील सुमारे ९५० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. वादविवाद स्पर्धेसाठी 'भारतीय राज्य घटनेचे कलम ३७० व कलम ३५ रद्द करणे योग्य की अयोग्य' या विषयावर चर्चा झाली. कलाकारांनी स्पर्धेच्या निमित्ताने सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकत बदलत्या राजकीय परिस्थितीवर गंभीर भाष्य केले.

मोबाईलचा अतिरिक्त वापर, पबजी गेम, पाणी जपून वापरा, टीव्हीचे दुष्परिणाम अशा विषयांवर कलेच्या माध्यम्यातून प्रबोधन झाले. खुमासदार नकला विद्यार्थ्यांनी केल्या. समूहगीत व सुगम गायनाचा कार्यक्रम दिवसभर सुरू होता.

पुढारी

# विद्यापीठात उद्या जिल्हा पोलिस अधीक्षकांचे विशेष व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने बुधवारी (दि. २५) दुपारी २ वाजता विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. 'स्पर्धा परीक्षा आणि रोजगार संधी व आव्हाने' या विषयावर डॉ. देशमुख विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.

# फलटण येथे शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव गुरुवारपासून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ३९ वा मध्यवर्ती युवा महोत्सव गुरुवार, दि. २६ ते २८ सप्टेंबर या कालावधीत मुधोजी महाविद्यालय, फलटण (जि. सातारा) येथे होणार आहे.

मध्यवर्ती युवा महोत्सवाचे उद्घाटन गुरुवारी (दि. २६) सकाळी ९.३० वाजता फलटण एज्युकेशन सोसायटीचे सचिव संजीवराजे नाईक-निंबाळकर यांच्या हस्ते व सोसायटीचे उपाध्यक्ष प्राचार्य विश्वासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. शनिवारी महोत्सवाचा समारोप समारंभ होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत. यावेळी उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

# धनंजय गुरव यांना पीएच.डी.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**



शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रातील वरिष्ठ ग्रंथालय सहायक, धनंजय शिवाजीराव गुरव यांना नुकतीच शिवाजी विद्यापीठाने ग्रंथालय व माहितीशास्त्र या क्षेत्रातील पीएच.डी. जाहीर केली. त्यांनी 'Scholarly Use of Internet by Research Scholars in Sciences at Universities of Maharashtra' या विषयावर विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला होता. या संशोधनात त्यांना आय. जी. आय. डी. आर. मुंबईचे मुख्य ग्रंथपाल डॉ. शामप्रसाद पुजार यांचे मार्गदर्शन, तर त्यांच्या मातोश्री विजया गुरव यांचे प्रोत्साहन लाभले.

करंजफेण / आकाश पाटील

# गुराखी ते डॉक्टरेट अनोखा संघर्ष

बाबूराव बमू घुरके यांनी जिद्दीने व स्वावलंबनाने शिक्षण घेऊन पदवीबरोबरच नेटसारख्या अवघड परीक्षेत यश मिळवले. त्याच्याही पुढे जाऊन गुराखी ते प्राध्यापक असा संघर्ष करून पीएच.डी. मिळवली आणि शाहूवाडीतील डंगे धनगर समाजातील पहिला डॉक्टर होण्याचा मान मिळवला.

गिरगाव धनगरवाडा हे शेळ्या-मेंढ्यांचे पालन करणारी धनगर वस्ती. याच धनगरवाड्यावरील बाबूरावचे आई-वडील अशिक्षित असल्यामुळे बाबूरावची जन्मतारीखही माहीत नाही. त्यांनी प्राथमिक शिक्षणाचे धडे गावातील प्राथमिक शाळेत गिरवले. यावेळी मात्र शाळेत कमी आणि गुराशेरडामागे मागे जास्त, असे शिक्षण घ्यावे लागले. माध्यमिक शिक्षण गावापासून दहा किलोमीटर पायपीट करत येथील येळवण जुगाई येथील जुगाई हायस्कूलमध्ये झाले, तर ज्युनिअर कॉलेज मलकापूरच्या रयत शिक्षण संस्थेत झाले. तेथेच त्यांच्या मनामध्ये 'कमवा व शिका' या स्वावलंबी शिक्षणाची बीजे रोवली गेली. बारावीनंतर नोकरी मिळावी म्हणून त्याने कळंबा येथून आयटीआय पूर्ण केले. यावेळी घरातून आता शिक्षण बस्स झालं. शेळ्या-मेंढ्या व्यवसाय करा, असे सांगण्यात आले. परंतु जिद्दी बाबूरावने पार्टटाइम नोकरी करत, कधी अर्धपोटी उपाशी राहून पुढील शिक्षणासाठी महावीर महाविद्यालयात प्रवेश घेतला. येथे त्यांनी भूगोल विषयात पदवी घेतली. त्याहीपुढे जाऊन शिवाजी विद्यापीठात पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश घेतला. पदव्युत्तरच्या शेवटच्या वर्षात असताना नेटसारख्या अवघड परीक्षेत घवघवीत यश मिळवले आणि त्याच यशाच्या जोरावर त्यांनी राजाराम कॉलेज कोल्हापूर, शिवाजी महाविद्यालय सातारा आणि आता ते शाहू महाविद्यालय कोल्हापूर या ठिकाणी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. नुकतीच त्यांनी लेव्हल्स ऑफ सोशल डेव्हलपमेंट इन कोल्हापूर डिस्ट्रिक्ट, जिओग्राफिकल ॲनालेसिस या विषयांमध्ये पीएच.डी. पूर्ण केली. त्यांना या कामांमध्ये एलफिस्टन कॉलेजचे विभागप्रमुख रतन हजारे, प्राचार्य सुरेश साळुंखे, प्राचार्य डॉक्टर चंद्रकांत खिलारे, डॉक्टर सचिन पन्हाळकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## संघर्षाचे चीज झाले



जिद्द, चिकाटी आणि सातत्य असेल, तर आपण कितीही बिकट परिस्थितीमध्ये शिक्षण घेऊ शकतो. माझ्या पीएच.डी.पर्यंतच्या शिक्षणामुळे दुर्गम गिरगाव धनगरवाड्याची ओळख सर्वत्र निर्माण करू शकलो. त्यामुळे शिक्षणासाठी केलेल्या या संघर्षाचे चीज झाल्यासारखे वाटते.

**- प्रा. डॉ. बाबूराव घुरके**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 SEP 2019
तरुण भारत




गडहिंग्लज : येथील शिवराज महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव. शेजारी प्र प्राचार्य देसाई आदी.

# 'विद्यार्थ्यांनी भवितव्य घडविण्यासाठी प्रयत्न करावा'

प्रतिनिधी
गडहिंग्लज

कॉलेज हे विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठीच्या प्रवेशाचा उंबरठा आहे. विद्यार्थ्यांनी आपले करीअर करण्यासाठी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आहे याची जाणीव ठेऊन विद्यार्थ्यांनी आपले भवितव्य घडविण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव यांनी केले.

येथील शिवराज महाविद्यालयात बी. एस्सी. संगणक व बी.सी.एस. भाग १ च्या समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे होते. स्वागत संगणक विभाग प्रमुख प्रा. सी. एस. निकम यांनी केले. डॉ. पांडव यांनी पुढे बोलताना, कार्यक्रम हे विद्यार्थ्यांसाठी पर्वणी आहे. विद्यार्थ्यांनी आनंदाबरोबरच आपल्या करिअरकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे, असे सांगून त्यांनी खरेतर संगणक क्षेत्राची निवड करुन आपल्या करीअरला गती देण्यासाठी या विभागातील नामवंत महाविद्यालय निवडले आहे हे खरोखरच विद्यार्थ्यांचे भाग्य असल्याचे स्पष्ट केले. आपली स्वप्ने घेऊन आलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी असे आवाहनही डॉ. पांडव यांनी केले. यावेळी सॉफ्टवेअर डेव्हलपर अश्विनी सुंडकर व शुभांगी गोडसे यांनी आपले करीअर कसे घडले याबाबत माहिती सांगितली. संस्थेचे अध्यक्ष किसनराव कुराडे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. प्र. प्राचार्य डॉ. बी. जे. देसाई, संचालक ॲड. दिग्वीजय कुराडे, बसवराज आजरी, प्रा. आझाद पटेल यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.


**पदव्युत्तर शिक्षणातून विद्यार्थ्यांनी करिअर घडवावे : सपोनि काशिद**

पदव्युत्तर शिक्षणातूनच विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी खरी दिशा मिळू शकते. ही दोन वर्षे अत्यंत महत्वाची आहेत. यामध्येच आपल्याला घडण्याची संधी आहे. विद्यार्थ्यांनी वेळेचे व्यवस्थापन करुन तसेच चर्चा करुन सुसंवाद साधावा, असे आवाहन सपोनि दिनेश काशिद यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 SEP 2010
तरुण भारत

■ **एकांकिका :** महाराष्ट्र कलोपासक मंडळ, गायन समाज देवल क्लब व शिवाजी विद्यापीठातील संगीत आणि नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालय एकांकिका स्पर्धा. स्थळ : वि. स. खांडेकर सभागृह, शिवाजी विद्यापीठ. वेळ : सकाळी ११ वाजता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 SEP 2019
तरुण भारत


संग्रहित छायाचित्र

# एकांकिकेच्या माध्यमातून सामाजिक संदेश

## ‘पुरुषोत्तम करंडक’च्या प्राथमिक फेरीत १९ संघ

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र कलोपासक मंडळ गायान समज देवल क्लब व शिवाजी विद्यापीठातील संगीत आणि नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित पुरुषोत्तम करंडक महाविद्यालय एकांकिका स्पर्धेच्या कोल्हापूर विभागातील प्राथमिक फेरीत १९ संघांनी सहभाग नोंदवला आहे. या संघांनी तोच चंद्रमा नभात, कोंबडा, जंगल, भोंडला आदी एकांकिकांचे सादरीकरण केले. या एकांकिकेतून पर्यावरण, विज्ञान, शिक्षणाविषयी सामाजिक संदेश देवून जनजागृती करण्यात आली.

शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये या स्पर्धेचे उद्घाटन समाज देवल क्लबचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पहिल्या दिवशी दिवसभरात सात महाविद्यालयांच्या संघांनी एकांकिका सादर केल्या. प्राथमिक फेरीसाठी देवदत्त पाठक, राजन जोशी, मेघना खरे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धेचा समारोप आज



(दि.२४) सायंकाळी सहा वाजता जेष्ठ मराठी रंगकर्मी आनंद काळे आणि विद्यापीठातील विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांच्या हस्ते बक्षीस वितरणाने होणार आहे. या फेरीनंतर पुणे येथे २७ ते २९ डिसेंबरदरम्यान या स्पर्धेची अंतिम फेरी होणार आहे. देवल क्लबचे उपाध्यक्ष चारूदत्त जोशी आंनी आभार मानले. यावेळी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख अंजली निगवेकर देवल क्लब खजिनदार राजेंद्र पित्रे, सुबोध गद्रे नाट्य विभागप्रमुख उमा नामजोशी, कलोपासक मंडळाचे अध्यक्ष काका निगोजकर, विश्वस्त शंकर उणेचा, अभिषेक भोकरे आदी उपस्थित होते.

### संघांनी सादर केलेल्या एकांकिका

शिवाजी विद्यापीठाच्या संघाने ‘तोच चंद्रमा नभात’, इस्लामपूर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या संघाने ‘कोंबडा’, कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील कॉलेजच्या संघाने ‘जंगल’, कोल्हापुरातील भारती विद्यापीठ अभियांत्रिकी कॉलेजच्या संघाने ‘भोंडला’, न्यू कॉलेजच्या संघाने ‘जंगल’ कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या संघाने ‘पाथरवट’, इचलकरंजी येथील डीकेटीई इंजिनिअरिंग कॉलेजच्या संघाने ‘शिकवण’, अशा एकांकिकांचे सादरीकरण करण्यात आले. प्रत्येक संघाला सादरीकरणासाठी एक तासाची वेळ देण्यात आली आहे. या स्पर्धा पाहण्यासाठी आलेल्या कलाप्रेमींनी वि. स. खांडेकर भाषा भवनचा परिसर फुलला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 SEP 2019
Times of India

# Distance edu admissions extended

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: The admission process for distance education courses of the Centre for Distance Education (CDE) of the Shivaji University, Kolhapur (SUK), has been extended till September 30.

The CDE offers admission in various programs like MSc, BA, BCom, BSc, MA, and Post Graduate diploma in translation in study centres across the Sangli, Satara and Kolhapur districts. The admission process for the same was organized earlier this year from June to August, but due to the flood situation in the region, the varsity sought the University Grants Commission's (UGC) permission to extend the deadline to September 30.